22.

164

# स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील चळवळी

डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे
समाजशास्त्र विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे जी बैठक झाली त्यामध्ये छोडो भारत हा ठराव मंजुर करुन आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधी गांधीकडे दिले. ९ ऑगस्ट क्रांतीदीन म्हणुन साजरा करण्याचे महात्मा गांधीने ठरविले. महात्मा गांधीच्या आदेशाने निजामाविरुध्द आंदोलन १९४० मध्ये सुरु केले. स्वामीजी हे हैद्राबाद संस्थानाचे आंदोलनाच्या नेते म्हणुन राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सभेला हजर होते. महात्मा गांधीच्या आदेशानंतर स्वामीजींना संस्थानामध्ये करा किंवा मरा हा नारा दिला. यामुळे निझाम व ब्रिटिशाविरुध्द अनेक तीव्र आंदोलने झाली. या जन आंदोलनाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ हे होते. आपला वकीली व्यवसाय सोडून आंदोलनात ते सहभागी झाले. त्याच्या बरोबर बाबासाहेब परांजपे, अनंतराव गणमुखी व राघवेंद्र दिवाण हे सहभागी झाले होते. या सर्वांना अटक झाली. मनोहर गुरुदेव, विनायकरावजी विद्यालंकार, सिताराम कृष्णराव पप्पू, अब्दुल रझाक, अब्दुल हमीद, बलराज भगवान, चिंतामणी साधु महाराज, प्रसन्नकुमार या लोकांनी सत्याग्रह केले.

जहालमतवादी म्हणून माणिकचंद पहाडे व गोविंदभाई श्रॉफ यांना अटक करुन जिल्हा सोडून जाण्यास बंदी घातली. हैद्राबाद संस्थानात चलेजाव आंदोलन चालविल्याबद्दल स्वामीजींना निजामाने 'नामपल्ली 'स्टेशनवर अटक केली. यापुर्वीच स्वामीजींनी मांडपाटील रामचंद्रराव (तेलंगणा) गोविंदभाई श्रॉफ (मराठवाडा) डॉ मेलाकाटे (कर्नाटक) यांची त्या भागातील नेतृत्वप्रमुख म्हणुन नियुक्ती केली. दिगंबरराव बिंदू यांच्या नेतृत्वाखाली कृती समितीची स्थापना केली. ११ जून १९४७ रोजी निझामाने संस्थान, स्वतंत्र राहणार असल्याचे घोषीत केले. निझामाच्या सक्तीचे धान्य वसुली धोरणाविरुध्द नांदेड जिल्हयातील तामसा येथील शेतकरी पुजप्पा बसप्पा जंगम यांनी शेतकरी मोर्चा काढुन हैद्राबाद संस्थानातील प्रशासनास विरोध केला.

मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयात सत्याग्रहाची नोंद सुरु झ ाली. ३० मार्च १९४८ पर्यंत सत्याग्रही तुरुंगात जात राहीले. जवळपास मराठवाडयातील ४३० सत्याग्रही आंदोलनात उतरले होते. अंबाजोगाई हे चळवळीचे केंद्र बनले होते. बाबासाहेब परांजपे, नारायण जोशी, यांच्या योगेश्वरी महाविद्यालयाने लोक लढयाच्या राष्ट्रीय राजकारणाचे केंद्र बनविले. यातील सत्याग्रही विनायकराव चारठाणकर, अनंत भालेराव, मनोहर सोनर, राजाराज टकसाळे, राजराम कोकीळ, सोनाजी नारायण कुलकर्णी, प्र.के. गुरुड, लक्ष्मणराव कुलकर्णी व श्रीराम भागडीया यांना मराठवाडयात तुरुंगात पाठविले. स्वामीजी, बाबासाहेब परांजपे, नारायण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई येथे १९४२ ला ४२ तरुणांनी एकत्र येऊन निझामास विरोध करण्याचे ठरविले. त्यांनी ४२ लोकांनी परभणी ला जावुन पिली हवेलीवर सत्याग्रह केला. शेवटी सर्वांना अटक करुन १३ महिन्याच्या तुरुंगवासासाठी परभणी येथे ठेवण्यात आले. तसेच चलेजाव आंदोलनात अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या १३ शिक्षकावर निझामाने कारवाई केली. या आंदोलनात कोणीही सहभागी होवु नये अशी ताकीद दिली.

१० फेब्रुवारी १९४३ पासुन महात्मा गांधींनी २२ दिवसाचे उपोषण सुरु केले होते. त्यास मराठवाडयातील सर्व सत्याग्रही लोकांनी पाठींबा म्हणुन लाक्षणिक सत्याग्रह केला. या आंदोलनास काही भागात हिंसक वळण लागले. यामध्ये रेल्वे व टेलीफोनच्या तारा तोडणे, पोस्टाच्या पेटया व रस्त्यावरील दिवे नष्ट करणे आदी प्रकारे ही आंदोलने जनतेतून झाली. यावेळस लातुर येथील आनंद राजाराम जैन, गुरुसंगी, काशीनाथ भोई यांनी तोडमोड केल्यामुळे त्यांना दहा वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली.

अंबोजोगाई येथील एका बुरुजावरील सरकारी रेडीओ वितारीत फेकुन दिला. निजामाच्या घोडदळाच्या छावणीला गंजीला आगी लावल्या. परळी रोडवरील पिवळ धायगुड येथे विजेच्या तारा तोडल्या अशा घटना मराठवाडयात सर्वत्र घडत होत्या. पैठण येथे विश्वनाथ गोविंद यांनी सरकारच्या विरोधात पोस्टर्स लावले होते. फुलंब्री येथे सरकारच्या विरोधात प्रभात फेरी काढली होती. या प्रभात फेरीतल्या लोकांना तुरुंगात टाकण्यात आले.

बाबुलाल व हिरालाल यांच्या नेतृत्वाखाली विनायकराव चारठाणकर व रामराव नाना यांच्या नेतृत्वाखाली परभणीत, आणि मलीकार्जुन जयराम यांच्या नेतृत्वाखाली उमरी येथे इ.स. १९४२ मध्ये सत्याग्रह करण्यात आले. सत्याग्रहाची तीव्रता वाढल्यानंतर निजामानी नेमस्तांच्या पाठींब्यावर आझादीची हैद्राबादचा जयघोष केला. सत्याग्रहांना अटक करुन त्यांना त्रास दिला मात्र सत्याग्रहाचे आंदोलन ते थांबवु शकले नाहीत.

औरंगाबाद येथे गोविंदभाई श्रॉफ यांचा गट २२ महिन्याच्या स्थानबध्दतेतून २२ ऑक्टोबर १९४२ रोजी सोडुन देण्यात आला. जेव्हा सत्याग्रहाची तीव्रता कमी झाली तेव्हा ९ महिन्याच्या आत टप्या टप्याने सर्व सत्याग्रही सोडुन देण्यात आले. चलेजाव आंदोलन हा शेवटचा लढा राहील असे वाटले. १५ डिसेंबर १९४३ रोजी स्वामीजी व प्रमुख नेत्यांना सोडून देण्यात आले. चलेजाव आंदोलनानंतर ही स्वामीजींना पुन्हा पुढील आंदोलनासाठी तयार रहावे लागले.

निझाम सरकारच्या विरोधात वाढत जाणारे आंदोलन लक्षात घेवुन २३ जुलै १९४६ ला सुधारणा धोरण जाहीर केले. त्यानुसार १३२ सदस्याचे कायदेमंडळ अस्तित्वात येणार होते. त्यामधील ७६ सदस्य निवडणुकीव्दारे तर ५६ सदस्य सरकार नियुक्त करणार होते. पण या

165

सर्वांत मुसलमानांना ५० टक्क्यांपेक्षा अधिक प्रतिनीधीत्व देण्यात येणार होते. मंत्रीमंडळ, सैन्य, पोलीस, गुप्तहेर खाते, संस्थानाची भाषा, इत्यादी महत्वाचे विषय मंत्रीमंडळाच्या कक्षेतुन वगळण्यात आले होते. घटना दुरुस्तीचा अंतीम अधिकार निझामालाच होता. दीडकोटी लोकसंख्या असणा-या संस्थानातील फक्त दीड लक्ष लोकांनाच मतदानाचा अधिकार मिळणार होता. त्यामुळे महात्मा गांधी, पंडीत नेहरु, अखिल भारतीय कॉंग्रेस राज्कारणी , संस्थानी प्रजा परिषद हैद्राबाद संस्थानातील प्रादेशिक परिषदा इत्यादी नी या सुधारणाचा धिक्कार केला. मराठवाडयातील नेते काशीनाथराव वैद्य यांनी देखील या सुधारणांचा निषेध केला.

महात्मा गांधीनी स्वामीजीस स्टेट कॉंग्रेसचा ध्वज फडकत ठेवण्याचा आदेश प्रमाण मानुन निजाम विरोधी आंदोलन स्वामीजीच्या नेतृत्वाखाली गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे यांच्या सारख्या असंख्य कार्यकर्त्यांना घेवुन सुरु ठेवले. आंदोलनापुढे हतबल होऊन निझामाने व शासनाने ३ जुलै १९४६ ला आपण होवून स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवली.

१ जानेवारी १९४७ रोजी बिदर येथे झालेल्या स्टेट कॉंग्रेसच्या स्थायी समितीची बैठक झाली. मवाळवादी व जहालवादी यांच्यामध्ये मतभेद झाले. त्यामधुन जे आरोप झाले त्यामुळे गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे व भाऊसाहेब यांनी अगोदर आपल्या पदाचे राजीनामे दिले. त्यानंतर स्वामीजींनी देखील आपल्या पदाचा राजीनामा दिला. यामध्ये बी रामकृष्णराव व स्वामीजी यांच्यात लढत झाली. यामध्ये स्वामीजी विजयी झाले. ते १९४६ साली स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. १९५० पर्यंत या पदावर ते कार्यरत राहीले. स्वामीजीकडे अध्यक्षपद असल्यामुळे हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा लढयाचे नेतृत्व स्वामीजीकडेच आले.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन हैद्राबादेतील मुशीराबाद या भागात १६,१७ व १९ जुन रोजी भरले. अधिवेशन हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या अध्यक्षतेखालीच आयोजीत करण्यात आले होते. भाषणातून स्वामीजींनी सांगीतले आमची काळजी घेण्यास आम्ही समर्थ आहेत. सरकारने या भाषणाची योग्य दखल घेतली नाही. तर त्याची जबाबदारी सरकारची असेल. तसेच आम्ही आदरणीय पाहुण्यावर बंधने घालणार नाहीत. सरकारने जे करायचे ते करावे. तसेच त्यांना ही मागणी केली की, हैद्राबाद संस्थान संघराज्यात विलीन करण्याचा निर्णय निजामाने तात्काळ घ्यावा नाहीत आम्हाला आंदोलनासाठी अंतिम व निर्णायक लढयासाठी तयार राहण्याचे आवाहन जनतेला केले. अभी नही तो कभी नही, करेंगे अशी घोषणाही त्यांनी केली. त्यांना लढयासाठी प्रचंड प्रतिसाद मिळाला. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र लढयासाठी तत्पर झाला.

११ जुन १९४७ रोजी निझामाने एक आदेश काढला की, हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राहणार अशी घोषणा केली. फर्मान ई मुबारक या नावाने प्रसिध्द आहे.हैद्राबाद संस्थानाचे विलनीकरण करण्यासाठी स्वामीजींच्या नेतृत्वाखाली कायदेभंगाची चळवळ करण्याचा निर्णय घेतला. यापुर्वीच स्वामीजींनी महात्मा गांधी व पंडीत नेहरुचा सल्ला घेतला होता. मुंबई, गदंग, विजयवाडा ही चळवळीची विभागीय कार्यालय राष्ट्रीय कॉंग्रेसने स्थापना केली होती. पुढे स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकारणीची बैठक २९ व ३० जुन १९४७ रोजी सोलापुर येथे झाली. या बैठकीत कॉंग्रेस अध्यक्षाच्या अटकेनंतर आंदोलनाचे संचालन करण्यासाठी दिगंबरराव बिंदु यांच्या अध्यक्षतेखाली एक कृती समिती स्थापन केली. स्टेट कॉंग्रेसने चळवळ यशस्वी राबवण्यासाठी जनतेला पुढील कृती कार्यक्रम दिला.

१) ७ ऑगस्ट हा विलीनीकरण दिवस साजरा करावा.
२) १५ ऑगस्ट हा स्वातंत्र दिन म्हणुन साजरा करावा. सामुदायिक ध्वजारोहन घ्यावे. शांततापुर्ण रित्या हरताळ पाळावा असे सांगीतले.
३) सिंधी, साग, ताड व मोहाची झाडे तोडून जंगल सत्याग्रह करावा.
४) लेव्ही किंवा सरकारचा कोणताच कर भरु नये.

वरील कॉंग्रेसने दिलेल्या कृती कार्यक्रमास जनतेमधुन खुप प्रतिसाद मिळाला. सामुदायिक झेंडावंदन १०४६ गावात घेण्यात आले. जंगलातील १,२२,६०० झाडे तोडुन जंगल सत्याग्रह केला. २७० गावांनी लेव्ही नाकारला तर ५५० गावांनी सरकारी कर भरण्यास नकार दिला. ५५८८ सत्याग्रहींना या आंदोलनातून अटक केली. कायदेभंग चळवळीचे दोन भाग झाले. झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहाचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे घेता येईल.

कायदेभंग चळवळीने जो कृती कार्यक्रम दिला होता त्याचा आढावा आपण घेतला. त्याचा एक भाग म्हणून आपण झेंडा सत्याग्रह केला. स्वामीजी व कृती समितीने ठिकठीकाणी तिरंगा झेंडा फडकविण्याचा व जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. संस्थानात तिरंगा फडकविण्यास व शिंदी, मोहाची, सागाची झाडे तोडण्यास कायदयाने बंदी होती. त्यामुळे झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह करणे म्हणजे ते कायदेभंग करणे अशी धारणा होती. स्वामीजीच्या नेतृत्वाखाली संस्थानात कायदेभंगाच्या सत्याग्रहास सुरुवात झाली. त्यातील ठळक घडामोडी पुढील प्रमाणे दिसून येतात.

१) ७ ऑगस्ट हा संघराज्य सामील होण्यासाठीचा दिवस म्हणुन साजरा करण्यात आला. सभा, सम्मेलन प्रभात फेरी काढण्यात प्रत्येकाने आपले योगदान दिले. घरावर तिरंगा ध्वज लावण्यात आला.
२) जनतेने सरकारशी असहकार करावा १५ ऑगस्ट १९४७ दिवस स्वातंत्र्याचा दिवस म्हणून साजरा करावा.
३) हैद्राबाद संस्थान १९४७ ला भारती संघराज्यात सामील व्हावे. या सबंधीची पत्रे, तारा, निजाम, भारतीय घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेद्रप्रसाद हंगामी सरकारचे पंतप्रधान पंडित नेहरु, उप पंतप्रधान सरदार पटेल आणि अखिल भारतीय संस्थानी आदी हा पत्रव्यवहार हैद्राबाद संस्थाच्या प्रमुखाशी केला.
४) झेंडा सत्याग्रहाच्या माध्यमातुन स्वाभीजींनी हैद्राबाद संस्थानास प्रखर विरोध केला. स्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार जनतेने ७ ऑगस्टला झेंडा सत्याग्रह सुरु केला. कर्नाटक भागाचे प्रतिनीधी म्हणुन कृष्णाचार्य जोशी होते. त्यांना पोलीसाकडुन अटक व सुटका करण्यात आली. इत्तेहाईल मुस्लीमचे नेते यामिन झुबेर यांनी रेल्वे स्टेशन व सार्वजनिक ठिकाणी कोणीही १५ ऑगस्ट तिरंगा ध्वज लावु नये असे सांगितले. हे संस्थान विरोधी कृत्य समजुन शिक्षा दिली जाईल परंतू स्वामीजींनी हे न ऐकता त्यांनी

सांगीतले की, आज ना उद्या हैद्राबाद संस्थानाचो झेंडा हा तिरंगाच असणार आहे. त्यामुळे आम्ही हे आंदोलन करणार असे ठरवले.

७ ऑगस्ट व १५ ऑगस्ट या दोन्ही दिवशी हे झेंडा आंदोलन झाले. त्यामध्ये कॉंग्रेस स्टेट, समाजवादी, कम्युनिष्ट असे १८०००, विद्यार्थी सहभागी होवुन झेंडा हातात घेवुन मिरवणूक काढली तर २१००० जनतेने तिरंगा हातात घेवून मिरवणूक काढली. त्यांना झेंडा घेवुनच तुरुंगात जावे लागले. मुंबई मद्रास एक्सप्रेसच्या प्रत्येक डब्यावर तिरंगा लावण्यात आला. उस्मानिया विद्यापीठावर मुकुंद उजंबळकरांनी तिरंगा लावला.उमरगा येथे औशाच्या शायुगिर महाराज यांनी १२५ जणांना घेवुन झेंडा सत्याग्रह केला झेंडा सत्याग्रह हा मराठवाडयातील सर्वात मोठा सत्याग्रह होता. रजाकार व पोलीसांच्या मदतीने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न निजाम सरकारकडुन झाला. आंदोलनात सहभागी लोकांवर लाठी हल्ले केले. त्यांना तुरुंगात पाठवण्यात आले.

कायदेभंग चळवळीतील दुसरा भाग हा जंगल सत्याग्रह हा होता. स्टेट कॉंग्रेसने कृती समितीव्दारे खेडयापासून जंगल सत्याग्रह करण्याचे आदेश दिले होते. १५ ऑगस्ट १९४७ पासुन जंगल सत्याग्रहास सुरुवात झाली. निझामास सिंदीच्या झाडाच्या लिंलावातून चांगला महसूल मिळत होता.त्याच बरोबर या झाडापासून निर्माण होणा-या पेयाचा त्रास सामान्य जनतेस अधिक होता. त्यामुळेच जंगल सत्याग्रहातून सिंदी, ताडी, मोहाची झाडे तोडण्याचा सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात झाडे तोडण्याचे काम दलित स्त्री पुरुष शेतकरी यांनी मोठया प्रमाणावर केले. या सत्याग्रहात नांदेड जिल्हयातील कोळी, डोरली, सोनारी, पाटनूर, निवघा, टेळकी या ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. जंगल सत्याग्रहामुळे स्वातंत्र्य लढयास लोक लढयाचे स्वरुप प्राप्त झाले.

नागनाथ परांजपे यांच्याकडे बिलोली, मुधोळ, भोकर हे तालुके देण्यात आले. तर बारड हे भुमीगताचे केंद्र बनले होते. बारडच्या परीसरात राजाराम देशमुख, साहेबराव बारडकर, लहानचे आबासाहेब लहानकर, नागेलीचे चिमणाजी पाटील भोकरचे स्वातंत्र्य सैनिक भुजंगराव पाटील किन्हाळकर हे भुमीगत राहुन आंदोलनात कार्य करत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाटनुर येथे १९४७ मध्ये सागाची झाडे तोडुन टाकली. या सत्याग्रहात पाटनुरचे मुंजाजी बि-हाडे, महादु पिराजी बि-हाडे, सखा महार भोसीकर, नामदेव येवले, दत्ता कांबळे अशा ३० महारांनी सहभाग घेतला. पोलीसांनी या गावातील लोकांना आंदोलनात सहभागी झाल्यामुळे बेदम मारहाण केली. कंधार तालुक्यातील टेळकी गावी १९४७ रोजी जंगल सत्याग्रह झाला. व्यंकट सहदेव, बाबुराव पालीमकर, तात्या कुर्तडीकर, वासुदेव भुसारी या कम्युनिष्ट लोकांसमोर राहुन स्टेट कॉंग्रेसचे संघटक आर.डी. देशपांडे व आनंदराव टेळकीकर हे चळवळ करीत होते. येथे पोलीसांकडून झालेल्या गोळीबारात चार लोक ठार झाले.

हदगाव तालुक्यातील डोरली येथे झालेल्या जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व पाथरडचे यादवराव हरिहरराव पवार, उमरीचे जहागिरदार झुबाजी नामाजी शिंदे, विश्वनाथ यादोजी अमृते यांनी केले. येथे झालेल्या लाठी हल्यात गोळीबारात सहा लोक ठार तर काही जखमी झाले.

कळमनुरी तालुक्यातील दाती या गावी ७ नोव्हेंबर १९४७ रोजी दिपाली पाटलाच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रह सुरु झाला. पोलीसांनी या सर्व सत्याग्रहींना न्यायालयात उभे केले तेव्हा सर्वानाच ६ महिने सक्तमजुरी व तीनशे रुपये दंडाची शिक्षा सुनावली. औरंगाबाद जिल्हातील लाडसांवंगी, जालना जिल्हयातील भोकरदन तालुक्यातील कोलता टाकळी या गावामध्ये मोठी जंगल सत्याग्रह झाले. कोलता टाकळी येथे रझाकार व सत्याग्रही यांच्यात मोठी लढाई झाली. मराठवाडयात २५ ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. संस्थानातील दहा हजार लोकांना अटक केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य जाहिर करतांना ब्रिटीशांनी पाकिस्तान निमीती करुन संपूर्ण भारतावरचा आपला अधिकार काढुन घेतला. त्यामुळे भारतातील सर्व संस्थाने स्वतंत्र झाली होती. त्यापैकी जुनागढ, कश्मीर आणि हैद्राबाद ही तीनच संस्.ने स्वतंत्र राहीली. इतर संस्थानीकांनी हिंदी संघराज्यात सामील होण्याचा निर्णय घेतला. निजामाने मात्र भारतीय संघराज्यातून वेगळे राहण्याचे ठरविले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी सत्तेवर आल्यानंतर भारत सरकारने निजामाकडे वाटाघाटीसाठी बोलणी सुरु झाली पण ती अपयशी ठरली.

१७ सप्टेंबर १९४७ रोजी निझामाने जाहीर केले की, हैद्राबाद एक सार्वभौम संस्थान आहे. १९ नोव्हेंबर १९४७ निझामाशी जैसे थे करार केला. त्यावेळी स्वामीजी तुरुंगात होते. रझाकाराचा नेता कासीम रझवी याने निजामाने भारत सरकारशी कोणताही करार करु नये असा आग्रह धरला. त्याच्यापुढे निझाम हतबल झाला. रझवीने रझाकाराची संख्या बळ वाढवुन गावोगावी अत्याचाराचे एक नवीन पर्व सुरु केले. संस्थानातील नागरीकांवर स्वातंत्र लढयातील कार्यकर्त्यांवर, भारतीय सिमेवरील चौकात खेडयावर हल्ले करुन सर्वत्र विध्वंस व रक्तपात सुरु केला. या सर्व अत्याचाराला निझामाची मुक्त संमती होती. हिंदुचा छळ रझाकाराकडुन सुरु झाला. रझाकाराने जिहादची घोषणा सुरु केली. इत्तेहाद न शस्त्रदिन साजरा केला. निजामाने सैन्यात वाढ, सोने-चांदी निर्यात बंदी, भारतीय चलन बंदी आदी महत्वपुर्ण निर्णय सुध्दा घेतले.

२ एप्रिल १९४८ रोजी मद्रास येथे कृती समितीची बैठक घेण्यात आली. निजाम सरकार व इत्तेहाद सरकार भारत सरकारच्या विरोधात लढाईसाठी तयार होते. या काळात स्वामीजींनी आपल्या भाषणातून एक महत्वपुर्ण संदेश दिला होता. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाल्याशिवाय स्वातंत्र्याला पुर्णत्व येणार नाही. भारताच्या स्वातंत्र्याची लढाई हैद्राबाद संस्थानच्या भुमीवर लढली जाणार असुन यात जनतेचा विजय होणार आहे. त्यासाठी जनतेला निकराने लढावे लागणार आहे आपण जर ही लढाई लढलो नाही तर आपल्या सर्वाच्या आयुष्यात उजेड येणारच नाही. त्यासाठी आपली खुप एकी असावी. आपण कमालीची शिस्त पाळली पाहीजे. आपल्या पैकी काही जणांचे बलीदान होईल. तरी देखील आपणास स्वातंत्र्याची ही ज्योत पुढे घेवुन जायचे आहे. हिमालयासारखी उत्तुंग कार्य आपण सर्वांना पार पाडावयाचे आहे. यासाठी आपणही हैद्राबाद संस्थान मुक्तीसंग्रामाची चळवळ अधिक गतीमान केली पाहीजे. कष्ट व त्याग याप्रसंगी आपण आपलेसारे धैर्य एकवटुन स्वातंत्र्य मिळे पर्यंत स्वस्थ बसणार नाही असा निर्धार करु या यांच्या या मार्गदर्शनामुळे या लढयात सहभागी असलेल्या जनतेला प्रेरणा व बळ मिळाले.

निजामाकडून झालेला करारभंग, रझाकारांनी सुरु केलेला रक्तपात लुटमार निजामी सैनाध्य उपदव्याप आणि हैद्राबाद संस्थानातील उग्र होत जाणा-या स्वातंत्र लढयाचे दडपण यामुळे भारत सरकारने निजामाला पत्र पाठवून रझाकार संघटनेवर बंदी घालून शांतता प्रस्थापित करण्याचे सुचविले पण निजामाने प्रतिसाद दिला नाही. संस्थानातील प्रजेवर दिवसेंदिवस अत्याचार वाढतच होते. औंढा नागनाथ येथे भरणा-या यात्रेत रझाकारांनी बॉम्बस्फोट केला जनतेची लयलुट केली. १४ एप्रिल १९४८ रोजी स्वामी ज्या तुरुंगात होते त्यावर रझाकारांनी हल्ला केला. पण स्वामीजी व अन्य सत्याग्रही त्यातुन वाचले. निजाम सरकारच्या धोरणावर टिका करणा-या इमरोझ या उर्दु वृत्तपत्राचे संपादक शोएबउल्लाखान यास हैद्राबाद सडकेवर अमानुषपणे ठार मारण्यात आले. कासीम रझवीने भारतीय नेत्याचा धिक्कार केला.

सर्व घडामोडी वाढल्यामुळे व्ही.पी. मेनन यांनी पोलीस कार्यवाहीची अपरीहार्यता स्पष्ट केली. सरदार पटेल यांनी परिस्थीतीची दाहकता ओळखली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी लेप्टनंट जनरल महाराज राजेंद्रसिंघजी यांच्या संचालकत्वाखाली पहाटे चार वाजता कार्यवाही सुरु झाली.

भारतीय सैन्याने औरंगाबाद, सोलापुर आदिलाबाद, कर्जल, विजयवाडा या पाच ठिकाणाहुन संस्थानात प्रवेश केला. या सैन्याबरोबर रणगाडे होते. सैन्याला हवाईदलाचे संरक्षण छत्र होते. या सैन्याला नळदुर्ग व श्रीपुरम येथे निजामाच्या लष्कराने व कर्जल येथे रझाकारांनी पतिकार केला. पण तो अल्पकाळ टिकला. निझामी लष्कर व रझाकार यांचा संयुक्त प्रतिकार मोडून काढण्यात आला. पहिले दोन दिवस प्रतिकार होत होता नंतर तो ढासळला.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी अनंत चतुर्थीच्या सायंकाळी पाच वाजता पोलीस कारवाई संपली. निझामाने शरणागती पत्करली. भारतीय सेनेची चार दिवस (१०९) तास कारवाई यशस्वी झाली.

निझामाने स्वतः नभोवाणीवरुन प्रजेला उद्देशुन भाषण केले, आपल्या सैन्याला आपण शस्त्रे खाली टाकुन युध्दबंदीचे आदेश दिले आहेत. माझ्या सरकारने राजीनामा दिला आहे. लोकांनी शांत रहावे. भारत सरकार सोबत मी मित्रत्वाचे नाते जोडत आहे. याच दिवशी स्वामीजींची तुरुंगातून सुटका करण्यात आली. स्वामीजीच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद संस्थान मुक्तीलढा हा यशस्वी झाला.

नरहर कुरुंदकरांनी या लढयाचे विवेचन अत्यंत मार्मीकपणे केलेले आहे. ते म्हणतात लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात लोकसंख्येशी सत्याग्रहाचे प्रमाण कधीच नव्हते. एक भाग जंगल सत्या ग्रहाचा आहे. त्याचेही स्वरुप प्रचंड होते. तिसरा भाग आंदोलनाचा आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात हैद्राबादेत सशस्त्र आंदोलन झाले. तसे इतरत्र असणे शक्यच नव्हते. या आंदोलनाचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थांनी केले.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामावदल अनेकांना लिखाण केले आहे जेष्ठ पत्रकार अनंत भालेराव म्हणतात, आंदोलनाचे श्रेय त्यांच्या नेतृत्वाला व त्याच प्रमाणे हैद्राबादेतील विशेषतः मराठवाडयातील सर्वजाती धर्मातील जनतेला निरपेक्षपणे द्यावे लागते. जनतेच्या हालअपेष्टांच्या त्यागातून बलीदानातून स्वातंत्र्याच्या हा काळ मराठवाडयाला पहायला भेटला हे विसरुन चालणार नाही. जनतेने आपल्या समस्यावर उभे केलेले हे आंदोलन होते. हजारो लोक या आंदोलनात सहभागी झाले. जंगल सत्याग्रह हे भुमीगत राहून केलेले कार्य महत्वपुर्ण ठरले. गावात येऊन लोकांवर अत्याचार करुन स्वातंत्र्य सैनीकांनी माहीती घेतली परंतु जनतेने एकही स्वातंत्र्य सैनीक त्यांच्या हाती लागु दिला नाही. खेडयापाडयातील जनतेने निजामाचे या कालखंडात अत्याचार सहन करावे लागले. परंतू ही जनता आंदोलनात तेवढयाच मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. त्यामुळे या लढयास जनतेच्या सहभागास उदात्तता व दिव्यता प्राप्त झाली.

अशा प्रकारे ही विविध आंदोलने झाली. त्यामध्ये मराठवाडयातील जनतेला यश मिळाले. हैद्राबाद संस्थान मुक्ती लढा यशस्वी झाला. या सर्व लढयास व आंदोलनास स्वामी रामानंद तीर्थ सारखे नेतृत्व लाभले. ही आंदोलने त्यांनी स्वतः सहभागी होवून यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. रोडे सोमनाथ (१९९९) मराठवाडयाचा इतिहास, विद्याबुकपब्लीकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.
२. काटे पी. व्ही. (१९९९), मराठ्वाडयाचा इतिहास, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद.
३. कठारे अनिल (१९६०) मराठ्वाडयाचा इतिहास, प्रारंभ कल्पना प्रकाशन नांदेड.
४. भालेराव अनंत (२००१), स्वामी रामानंद तीर्थ, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली.
५. कुलकर्णी सुहास, मिलींद चपानेकर संपादक (२०१३) असा घडला भारत, रोहन प्रकाशन पुणे.
६. पारवे रमेश संपादक (२०१५) हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील मराठवाडयाचे योगदान, 'सोशल सायंन्स रिपोर्ट प्रकाशन, लातुर.
७. मराठवाडा साप्ताहीक अंक १९४७ ते १९७२.


□□□